Mehmuda Shikshan & Mahila Gramin Vikas Bahu-uddeshiya Sanstha, Nagpur

# CENTRAL INDIA COLLEGE OF BUSINESS MANAGEMENT & STUDIES (M.B.A.)

LONARA, NAGPUR [DTE CODE : MB4129]

Ref: NAAC 2023/ MLD/Cr-7.1.2 Date-20/03/2023

| | |
|---|---|
| Criteria 7.1.2 | **The Institution has facilities and initiatives for**<br>1. **Alternate sources of energy and energy conservation measures**<br>2. **Management of the various types of degradable and nondegradable waste**<br>3. **Water conservation**<br>4. **Green campus initiatives**<br>5. **Disabled-friendly, barrier free environment** |
| Findings of DVV | 1.HEI is requested to please provide all supporting documents as per SOP duly sealed and signed by the Head of Institution. 2.Please provide Policy documents of the institution. 3.Please provide Geo tagged photographs and videos of the facilities with caption. 4.Please provide the Bills for the purchase of equipments for the facilities created under this metric. 5.Please provide the Brief report of the facilities or Circulars, reports. 6.Please provide Ramps / rails/lift/wheel chair/signage board/restroom/ software include specific requirement of Divyangjan for their use. 7.Please provide Any other relevant proof for the selected options. NOTE |
| Response/ Clarification | 1. Policy document towards disabled friendly, barrier free environment. Plastic free campus and green campus and management of waste **(Appendix I)**<br>2. Geotagged pictures of facilities available with captions below it **(Appendix II)**<br>3. Govt. notification on implementation of these facilities **(Appendix III)** |

IQAC Coordinator
Central India College of Business Management & Studies, Nagpur

Officiating Principal
Central India College of Business Management & Studies
Lonara, Nagpur.

Central India College of Business Management & Studies ★ Lonara, Nagpur ★

# Appendix I

Date: **August 4, 2018**

Ref. No.: CICBMS/EEU/041

# Environment improvement measures to ensure a sustainable Green Campus

The relationship between CICBMS and nature is a long and enduring one, something that students and staff of the college are aware of. The buildings of this educational institution stand on the solid rock, a topographical feature that the Congregation has consciously chosen to preserve and protect. CICBMS is very often recognized as the college with huge rocks jutting from the concrete giving it a completely natural and organic facade.

Since 2009, the college has always had sustainable initiatives at the core of all activities. 3.75 acres lush campus in the Diplomatic Enclave only 2366 sq.mt. has been built up. The rest of the campus can be categorized as playgrounds, lawns and gardens. A huge area is left in its natural form and acts as a natural habitat for biodiversity and a large variety of species of grasses, herbs, shrubs and trees.

**Scope of the Policy**

The Green Campus, Energy and Environment Policies will develop exciting new co-curricular and extracurricular practices that encourage students to take the lead in creating positive change. These initiatives call for a thorough review of all infrastructural, administrative functions from the standpoints of energy efficiency, sustainability and the environment.

The focus areas of this policy are:

- ➔ Clean Campus area under Clean Campus Initiatives
- ➔ Clean Air Initiatives
    - ◆ Smoking Free Campus
- ➔ Infrastructure
    - ◆ Solar Power Plant
    - ◆ Installation of Energy Efficiency Equipment

- ◆ Water Conservation through Rainwater Harvesting System

➔ Waste Management processes

- ◆ Solid Waste Management
- ◆ Liquid Waste Management
- ◆ E-Waste Management

➔ Awareness Initiatives

➔ Environment-centric Student Societies and Department Activities

➔ Green Audit

➔ Energy Audit

➔ Plastic-Free Campus

**Policy: Clean Campus Initiatives**

CICBMS had pledged to actively coordinate cleanliness activities in the college and beyond the campus in accordance with the vision of Swachh Bharat Abhiyan. It commits to continue with this Programme.

**The broad vision is as follows:**

1. Generating mass awareness on cleanliness and hygiene amongst students and staff members by holding regular cleanliness drives. The idea is to motivate them to contribute in a proactive manner.
2. Activities under 'Swachh Bharat Abhiyan' will be a key component of all the community work being done by volunteers of the college.
3. Staff Members will be encouraged to participate in the cleanliness drive in the college campus.
4. Events such as poster and slogan competitions, essay writing, spoken word poetry, speeches, skits on 'Swachh Bharat' will be organised.
5. Rallies on themes connected with 'Swachh Bharat Abhiyan' in and around the college campus will be conducted to create mass awareness.

7. Remove all kinds of waste material like broken furniture, unusable equipment etc.
8. Administer of the pledge by students and staff members to maintain cleanliness of the college campus and its surrounding areas on an annual basis.
9. Conduct workshops on the 3Rs: Reduce, reusing and recycling of waste.
10. Commit to manage waste and maintain clean campus especially during college events.

**Infrastructural Initiatives**

**Renewable Sources of Energy**

The Institute is dedicated to minimize and sustainably manage its use of electricity. The college believes in reducing the consumption of electricity produced by non-renewable resources by switching to clean energy sources like solar energy for purposes like lighting the campus.

**Energy Saving and Energy Efficient Equipment**

We commit to install environment-friendly electrical appliances that save energy and reduce wasteful inefficiencies. The college believes in using clean energy such as LED lighting.

**Water Conservation through Rain water Harvesting System**

As an institution located in the rural area of Nagpur District, the Institute has also committed itself to this effort to replenish the ground water table by practicing rain water harvesting. This practice helps in the replenishment and recharge of the groundwater.

**Waste Water Management System**

CICBMS strives to have a minimal impact on the environment and is dedicated to reduce and manage the waste generated by the college campus. The following specific procedures will be undertaken to ensure CICBMS's contribution in protecting the environment.

**Solid Waste Management:** With its aim to provide holistic education that also has a positive impact on the environment, the college will adopt practices that will mitigate the generation, and manage solid waste through the following methods:

- Systematically engage with the 3Rs of environment friendliness (Reduce, Reuse and Recycle).
- Collect paper waste produced on campus and collaborate with scrap dealers for recycling.
- Reduce solid waste by developing a technology-centric teaching and administrative model.
- Reduce use of paper by supporting digitization of attendance and internal assessment records.
- Reducerequirementofprintedbooksbyupdatingthee-booksande-journalscollectionofthecollegelibrary.

- Encourage the students and teachers to use emails for assignment submissions.
- Take initiatives to spread awareness amongst students about
- Food wastage and ways of minimizing it
- Minimizing the use of packaged food
- The habit of reusing and recycling non-biodegradable products
- Organizing workshops for students on solid waste management.

**Liquid Waste Management**

- Maintain leak proof water fixtures.
- Minimize the use of water by constructing more Indian style toilets instead of western style toilets.
- Continued employment of a caretaker to take immediate steps to stop any water leakage through taps, pipes, tanks, toilet flush etc.
- Prevention of release and mixing of oil from the college canteen liquid waste in the municipal drainage system by use of Grease trap mechanism. This way the Biochemical Oxygen Demand is reduced in the effluent waste water produced by the CICBMS canteen.
- Reuse of waste water generated by the Reverse Osmosis (RO) system in washrooms.

**Plastic-Free Campus**

CICBMS has been observing most of its duties in terms of solid waste management since its inception. In view of the Government of India's resolution to ban all single use plastics due to the hazardous impact of plastic use and pollution, the college administration strictly bans the use of single use plastics in its premise to make it a 'Plastic Free Campus'.

**Conduct Green Audit**

The college aims to regularly conduct a Green Audit of our college campus to assess our strengths and weaknesses to further our goals of long-term sustainability. A green audit is a useful tool to determine how and where most energy or water or resources are being used. The college can then consider how to implement changes and make savings. It can determine the type and volume of waste. Recycling projects or waste minimization plans can be adopted. It will create health consciousness and promote environmental values and ethics. It provides a better understanding of the impact of eco-friendly practices on campus. Green auditing will promote financial savings through reduction of resource use. It is imperative that the college evaluate its own contributions toward a sustainable future.

**Conduct Energy Audit**

An Energy Audit to be conducted as and when required to further reduce its carbon foot print. The importance of reducing energy consumption cannot be overstated. The energy audit, with its specialized tools will identify wastage of energy. Such an inspection often reveals several different flaws which cause a loss of significant amounts of energy which the college will not be able to detect. These flaws often have easy and affordable solutions and provide significant savings.

Central India College of Business Management & Studies ★ Lonara, Nagpur ★

Officiating Principal
Central India College of Business
Management & Studies
Lonara, Nagpur.

# Appendix II

# CICBMS provides Barrier Free Built Environment for disabled and elderly persons







Ramp Facilities for Specially Disabled Person







Toilet Facilities for Specially Disabled Person

# Facilities for Special Disabled Person







Ramp Facilities for Specially Disabled Person







Toilet Facilities for Specially Disabled Person














Institute installed Water facilities in strategic location of college premises and also nearby administration office with RO Facilities.




Plastic Free Campus under Plastic Free Initiatives











**Safety and Security measures in the Campus:**

**Central India College Business Management and Studies provides** quality education with the quality services and where safety of our students is our primary motto. Instead of paying focus just on providing them security and ensuring their safety we also make sure to inculcate in them such values and skills through which they can cope themselves from the upcoming problems in their life. Violence and violence related activities are strictly banned within or outside the college premises.













Institute is Practicing to resolve the problem of deficiency of water through Rain Water Harvesting Management.







Parking Facilities

## Waste Water Management System




Toilet




Waste Water Chamber







Installed SDP tanks to recycle the waste water under Waste Water Management Process













Institute is Practicing to resolve the problem of deficiency of water through Rain Water Harvesting Process.













Institute has Green Campus











Dustbins Installed on various strategic Location of the Campus

# Appendix III

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट १९२३ द्वारे स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ (सा. २०१७ महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## अधिसुचना

क्र.रातुमनावि / सा.परीक्षा / 1520 दिनांक :– 05 .12. 2017

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी सलग्नीत व संचालीत सर्व संबधीत विद्यार्थी व प्राचार्य, विभागप्रमुख, परीक्षा केन्द्राधिकारी, सहकेंद्रधिकारी यांना सुचित करण्यात येते की, विद्यापीठाच्या परीक्षांचे संचालन करते वेळी महाराष्ट्र शासन निर्णय क्र. संकिर्ण–2016 / प्र.क्र. / 302 / विशि–3, दिनांक 04. मार्च 2017 रोजीच्या पत्रानुसार नुसार दिव्यांग विद्यार्थ्यांना लेखी परीक्षे करीता प्रत्येक तासाला 20 मिनिटे अतिरिक्त वेळ देण्याबाबत तसेच अंध व इतर प्रकारच्या सदर शासन निर्णयानुसार पात्र विद्यार्थ्यांना पेपर लिहण्याकरीता मदतनिस (Writer) पुरविण्याबाबत सदर शासन निर्णयानुसार कार्यवाही घेवुन विद्यार्थ्यांना यानुसार सवलत देण्यात यावी याबाबत परीक्षा व मुल्यमापण मंडळाच्या दिनांक 07.10.2017 ला झालेल्या सभेत निर्णय घेण्यात आलेला आहे. तरी आपण आपल्या परीक्षा केद्रावर दिव्यांग विद्यार्थ्यांना वेळ देण्याबाबत व मदतनिस (Writer) पुरविण्याबाबत सदर शासन निर्णयानुसार कार्यवाही घ्यावी.

सहपत्र :– सदर उपरोक्त शासननिर्णय

संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ.

प्रतिलिपी माहितीसाठी अग्रेषित :–

1. प्राचार्य / संचालक. सर्व संबंधित महाविद्यालये / संस्था, परीक्षा केन्द्राधिकारी
कृपया विद्यार्थ्यांच्या माहितीकरिता आपल्या संस्थेतील व महाविद्यालयातील माहितीफलकावर हे अधिसुचना लावावे.

उपकुलसचिव (परीक्षा व पुर्व)
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ.

Scanned with CamScanner

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ (सन २०१७ महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)


## अधिसुचना

क्र.रातुमनावि / सा.परीक्षा / 1520 दिनांक :– 05 .12. 2017

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नीत व संचालीत सर्व संबधीत विद्यार्थ्यी व प्राचार्य, विभागप्रमुख, परीक्षा केन्द्राधिकारी, सहकेंद्रधिकारी यांना सुचित करण्यात येते की, विद्यापीठाच्या परीक्षांचे संचालन करते वेळी महाराष्ट्र शासन निर्णय क्र. संकिर्ण–2016 / प्र.क. / 302 / विशि–3, दिनांक 04. मार्च 2017 रोजीच्या पत्रानुसार नुसार दिव्यांग विद्यार्थ्यांना लेखी परीक्षे करीता प्रत्येक तासाला 20 मिनिटे अतिरिक्त वेळ देण्याबाबत तसेच अंध व इतर प्रकारच्या सदर शासन निर्णयानुसार पात्र विद्यार्थ्यांना पेपर लिहण्याकरीता मदतनिस (Writer) पुरविण्याबाबत सदर शासन निर्णयानुसार कार्यवाही घेवुन विद्यार्थ्यांना यानुसार सवलत देण्यात यावी याबाबत परीक्षा व मुल्यमापण मंडळाच्या दिनांक 07.10.2017 ला झालेल्या सभेत निर्णय घेण्यात आलेला आहे. तरी आपण आपल्या परीक्षा केद्रावर दिव्यांग विद्यार्थ्यांना वेळ देण्याबाबत व मदतनिस (Writer) पुरविण्याबाबत सदर शासन निर्णयानुसार कार्यवाही घ्यावी.

सहपत्र :– सदर उपरोक्त शासननिर्णय

संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ.

प्रतिलिपी माहितीसाठी अग्रेषित :–

1. प्राचार्य / संचालक, सर्व संबंधित महाविद्यालये / संस्था, परीक्षा केन्द्राधिकारी
   कृपया विद्यार्थ्यांच्या माहितीकरिता आपल्या संस्थेतील व महाविद्यालयातील माहितीफलकावर हे अधिसुचना लावावे.

उपकुलसचिव (परीक्षा व पुर्व)
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ.

Scanned with CamScanner

**उच्च शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना परिक्षेमध्ये सोयी-सवलती देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१६/प्र.क्र. ३०२/विशि-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ०४ मार्च, २०१७.

**प्रस्तावना:-**

राज्यातील सर्व उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थामध्ये विशेष गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांचे अध्ययन, अध्यापन व मुल्यमापनाची पध्दती वेगळी असणे आवश्यक आहे. विषेश गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांना शैक्षणिक मुल्यमापनामध्ये गरजेनुरूप सोयी सवलती देण्यासंदर्भात धोरण निश्चितीसाठी शासन स्तरावरुन समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या बैठकीमध्ये सर्व अकृषी विद्यापीठाचे परिक्षा नियंत्रक व दिव्यांगांशी संबंधीत असलेल्या विविध संस्थांचे तज्ञ प्रतिनिधी उपस्थित होते. सदरहू बैठकीमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणामध्ये येणाऱ्या अडचणी व परिक्षा पध्दतीमध्ये त्यांना दिल्या जात असलेल्या व आवश्यक असलेल्या सोयी सुविधांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली व त्यानुसार आवश्यक त्या सूचना व अभिप्राय मागविण्यात आले. प्राप्त अभिप्राय व सूचनांचा विचार करून उच्च शिक्षण/विद्यापीठीय शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना सोयी-सुविधा देण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्यानुसार खाली नमूद केल्याप्रमाणे शासन निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:-**

विशेष गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांची खालीलप्रमाणे वर्गवारी आहे.

१. पूर्णत: अंध (Blindness)
२. अंशत: अंध (Low vision/ Partial Blind)
३. कुष्ठरोग निवारित ( Leprosy Cured Persons)
४. कर्णबधिर (Hearing Impairment - deft and hard of hearing )
५. लोकोमोटर डिसेबिलिटी अस्थिव्यंगासह (Locomotor Disability including Orthopedic disability)
६. शारिरीक वाढ खुंटणे (Dwarfism)
७. बौध्दिक अक्षम (मतिमंद/गतिमंद) (Intellectual Disability -Mentally challenged/Slow Learners)
८. मानसिक आजार (Mental Illness)
९. स्वमग्न (Autism Spectrum Disorder)
१०. सेरेब्रल पाल्सी (Cerebral palsy)
११. स्नायुंची विकृती (Muscular Dystrophy)
१२. मज्जासंस्थेचे तीव्र आजार (Chronic Neurological Conditions)
१३. अध्ययन अक्षम (Specific Learning Disabilities)
१४. बहुविध द्द्धन अपदयरर (Multiple Sclerosis)
१५. भाषण (वाचा) व भाषा अक्षमत्व (Speech and Language Disability)
१६. थॅलस्सेमिया (Thalassemia)/ कॅन्सर (Cancer)
१७. हिमोफिलिया (Hemophilia)
१८. सिकल सेल आजार (Sickle Cell Disease)
१९. बहुविकलांग (Multiple Disabilities)

२०. ॲसिड ॲटॅक व्हिक्टीम (Acid Attack Victim)

२१. पार्किंसन्स आजार (Parkinson॰s disease)

**(१) उपरोक्त सर्व प्रकारातील उच्च शिक्षण संस्थांमधील/ विद्यापीठ स्तरावरील शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना खालील नमूद समान सोयी-सुविधा व सवलती उपलब्ध करुन देण्यात याव्यात :-**

अ) विद्यार्थ्यांच्या सोयीनुसार जवळचे परीक्षा केंद्र देय राहील. (शक्यतो विद्यार्थी ज्या महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत आहे तेच महाविद्यालय किंवा त्याच्या घराजवळचे महाविद्यालय परिक्षाकेंद्र असावे) सर्व प्रकारच्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका पी.डब्ल्यू.डी. शिक्का मुद्रित करुन तपासणी करिता वेगळया ठेवण्याची व्यवस्था करावी.

ब) विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या परीक्षेच्या (Internal, External, Practical) प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी प्रति तास २० मिनिटे अधिक वेळ देय राहील.

क) अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना सत्रातील प्रत्येक परीक्षेमध्ये लेखी, तोंडी, प्रात्यक्षिक, अंतर्गत व प्रकल्प संशोधन परिक्षेमध्ये एकूण गुणांच्या ३ टक्के गुणांची सवलत एकाच विषयामध्ये किंवा सर्व विषयांमध्ये विभागून देण्यात यावी.

ड) परिक्षेसाठी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक यांचे पूर्व परवानगीने लेखनिक घेता येईल. मात्र लेखनिकांची व्यवस्था पालकांनी महाविद्यालयाचे सहकार्याने करावी अन्यथा शक्य झाल्यास महाविद्यालयाने लेखनिकांची यादी ठेवावी व या यादीतून लेखनिक देण्यात यावा. यासाठीचा पत्रव्यवहार परिक्षा आवेदनपत्र सादर करतेवेळी करण्यात यावा. आवश्यकतेनुसार सांकेतिक भाषा विश्लेषक (Sign Language Interpreter) उपलब्ध करुन द्यावा.

इ) जे विद्यार्थी आरोग्य व शारीरिक शिक्षण, समाजसेवा, बालवीर /वीरबाला/ छात्रसेना (N.C.C.) संरक्षण अभ्यास (Defence Studies) / मुलकी संरक्षण व रस्ता सुरक्षा गस्त (Civil Defence and Road Safety Patrol) इत्यादी विषय पूर्ण करु शकत नाहीत, त्या विद्यार्थ्यांना या विषयात सवलत मिळण्यासाठी अर्ज दिव्यांग प्रमाणपत्रासह संबंधित महाविद्यालयामार्फत विद्यापीठाकडे पूर्व मान्यतेसाठी पाठवावा किंवा संबंधित विद्यापीठाने अशी सवलत मिळण्याबाबतचे नियम तयार करून सर्व महाविद्यालयांचे निदर्शनास आणावेत.

ई) सर्व प्रकारच्या दिव्यांग मुलांसाठी स्पेलींग, व्याकरण, विरामचिन्हे याबाबतीत गुणदान कमी करण्यात येवू नये.

उ) यापैकी काही वर्गवारीसाठी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी वर्गात आवश्यक असलेली हजेरी/उपस्थिती बंधनकारक राहणार नाही. त्यासाठी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची परवानगी बंधनकारक राहील.

**वरीलप्रमाणे सर्वसाधारण सोयी-सवलती सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांना देय राहतील. याशिवाय त्यांचे दिव्यांगत्वाच्या प्रकारानुसार काही विशेष सोयी-सवलती खालीलप्रमाणे देय राहतील :-**

**२. पूर्णत: अंध (Blindness) व अंशत: अंध (Partial Blind) विद्यार्थ्यांकरीता सवलती :-**

१) परिक्षा कालावधीमध्ये गणितीय पाटीचा (Trailor Frame) वापर करता येईल.

२) परिक्षा कालावधीत आवाजाच्या गणकयंत्राचा (Talking Calculator) वापर करता येईल.

३) अंशत: अंध विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिका लिहिण्यासाठी स्केचपेनचा व प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी ग्लास मॅग्नीफायरचा वापर करता येईल.

४) अंशत: अंध विद्यार्थ्यांसाठी मोठया अक्षरातील (Arial २० size) प्रश्नपत्रिका छापण्यात यावी.

५) परिक्षेच्या वेळी गरजेनुसार अॅबॅकस व भूमितीय साहित्य साधनाचा वापर करता येईल. आकृत्या, नकाशे, तक्ते इ. न काढण्याची सवलत देय राहील, त्याचे गुण त्या विद्यार्थ्याला त्या प्रमाणात देण्यात येतील अथवा आकृत्या , नकाशे , तक्ते इ. प्रश्नांसाठी पर्यायी प्रश्न देण्यात यावेत.

६) प्रात्यक्षिक परीक्षेऐवजी या विद्यार्थ्यांना या विषयाची तोंडी परीक्षा/बहूपर्यायी उत्तरे असलेली लेखी परिक्षा (प्रात्यक्षिकांवर आधारित) देता येईल. तोंडी परीक्षेत प्रात्यक्षिकांवर आधारित प्रश्न विचारले जावेत.

७) जर एखादया विद्यार्थ्यांला संगणकाच्या द्वारे परिक्षा दयावयाची असल्यास स्क्रीन रिडींग सॉफ्टवेअर असलेला संगणक- NVDA Software/तत्सम इतर संगणक प्रणालीचा वापर करता येईल. परंतु त्यासाठी विद्यापीठाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

८) विदयार्थ्यांना टेपरेकॉर्डरद्वारे प्रश्न देण्यात यावेत आणि त्यांनी प्रश्नांना दिलेली उत्तरे टेपरेकॉर्डवर रेकॉर्ड करण्यात यावीत व त्यांच्या बसण्याची स्वतंत्र व्यवस्था असावी.

९) ज्यावेळी दृष्टीहीन मुलगा बऱ्याच वेळेपासून ब्रेलमध्ये लिहित असेल आणि ज्यामुळे त्याला थकवा जाणवत असेल अशावेळी त्यास काही काळ विश्रांती देण्यात यावी, तथापि ही वेळ सवलतीच्या एकूण वेळेपेक्षा जास्त नसावी.

१०) ज्यावेळी ब्रेलवाचन, लेखन चाचणी असेल अशावेळी ब्रेललिपीतील चुकांबाबत गुण कमी करु नयेत. तसेच गरज असेल अशावेळी मौखिक पध्दतीने प्रश्नांची उत्तरे विचारुन त्याला कितपत ज्ञान आहे याबद्दल चाचणी घेण्यात यावी. चित्र/आकृत्या/नकाशे याऐवजी पर्यायी प्रश्न देण्यात यावेत. वस्तुनिष्ठ प्रश्नांसाठी सुस्पष्ट सूचना देण्यात याव्यात.

११) ज्यावेळेस निबंधात्मक प्रश्न असतात आणि ते प्रश्न ब्रेलमध्ये लिहितात अशावेळी सदर प्रश्नावर गुणदान करतांना उत्तरे मोठ्या प्रमाणात लिहिलेले आहे हे न पाहता मुख्य मुद्यांवर (Key Points) वर लक्ष देण्यात यावे. महाविद्यालयाने याविषयीचा पत्रव्यवहार विद्यापीठाशी करणे अत्यावश्यक आहे.

१२) प्रकल्पावर आधारित लेखी परिक्षेऐवजी तोंडी परिक्षा घेण्यात यावी.

**(३) कुष्ठरोग निवारित (Leprosy Cured Persons) विद्यार्थ्यांसाठी सवलती :-**

१. ज्या महाविद्यालयात हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत ते किंवा जवळचे महाविद्यालय या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी परीक्षा केंद्र म्हणून देण्यात यावे.

२. शिकत असलेल्या महाविद्यालयातच शरीराची योग्य स्थिती आणि बसण्याच्या व्यवस्थेसाठी अनुकुल तयार केलेले टेबल, टायपिंग मशीन, खुर्च्या यांची या विद्यार्थ्यांसाठी व्यवस्था करण्यात यावी. यासाठी संबंधित महाविद्यालयाने विद्यापीठाची मान्यता/पूर्वपरवानगी घ्यावी.

३. अचानक उपचार करावे लागतील अशी स्थिती उत्पन्न झाली ; परीक्षेच्या कालावधीतच उपचारासाठी हॉस्पिटल मध्ये दाखल व्हावे लागले तर अशा प्रसंगी विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करुन त्यास पुन:परीक्षेची (Re-Exam) परवानगी देण्यात यावी. विषय शिक्षक, महाविद्यालयाचे प्राचार्य व परीक्षा विभागाचे प्रमुख यांनी यासाठी समन्वय साधावा.

४. विद्यार्थ्यांना लिहायला सोयीचे व्हावे यासाठी वेगळया प्रकारची पेन्सिल, पेन, ग्रीपर, संगणक देण्याची व्यवस्था उपलब्ध व्हावी.

५. गरजेनुसार लेखनिक घेण्याची परवानगी देण्यात यावी.

**(४) कर्णबधिर विद्यार्थ्यांसाठी** (Hearing Impairment-deft and hard of hearing) **सवलती :-**

१) प्रश्नाचे उत्तर अपेक्षित शब्दमर्यादेपेक्षा कमी शब्द मर्यादेत लिहिता येईल. दीर्घोत्तरी प्रश्नांची उत्तरे मुद्यांमध्ये लिहिता येतील. दिर्घोत्तरी प्रश्नांमध्ये मुख्य मुद्यांच्या अनुषंगाने (Key points) उत्तर लिहील्यास परिक्षकांनी उत्तरामध्ये थोडक्यात विषयाच्या अनुषंगाने माहिती/उत्तरे दिली आहेत का ते तपासून गुणदान करावे.

२) या मुलांसाठी स्पेलींग, व्याकरण, विरामचिन्हे या बाबतीत गुणदान कमी करण्यात येऊ नयेत.

३) सर्व विषयाच्या प्रश्नपत्रिकेमध्ये प्रश्नांची शब्दरचना सरळ व सोपी असावी.मौखिक मुल्यमापनासाठी लेखीचा पर्याय असावा.

४) आवश्यकता असल्यास अशा विद्यार्थ्यांना वाचनिक/ सूचक (Prompter) देण्यात यावा.

५) गरजेनुसार विद्यार्थ्याला त्यास हव्या त्या भाषेत पेपरी लिहिण्याची परवानगी देण्यात यावी.

**(५) लोकोमोटर डिसेबिलिटी अस्थिव्यंगासह** (Locomotor Disability Including Orthopedic Disability), **बहुविकलांगता** (Multiple Disabilities) **व सेरेब्रल पाल्सी** (Cerebral Palsy) **विद्यार्थ्यांसाठी सवलती :-**

१) ज्या महाविद्यालयात हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत तेच महाविद्यालय या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी परीक्षा केंद्र म्हणून देण्यात यावे. शिकत असलेल्या महाविद्यालयातच शरीराची योग्य स्थिती आणि बसण्यासाठी अनुकुल असे तयार केलेले टेबल, टायपिंग मशीन, खुर्च्या यांची या विद्यार्थ्यांसाठी व्यवस्था करावी लागेल. तथापि, यासाठी संबंधित महाविद्यालयाने विद्यापीठाची मान्यता/पूर्व परवानगी घ्यावी.

२) ज्या विद्यार्थ्यांना आवश्यकता असेल त्यांना उत्तरपत्रिका टाईप करणे किंवा लिहिण्यासाठी तसेच पूर्ण प्रश्नपत्रिका किंवा प्रश्नपत्रिकेचा काही भाग लिहिण्यासाठी लेखनिक घेण्यास परवानगी देण्यात येईल. जर हे विद्यार्थी स्वत: प्रश्नपत्रिका सोडवत असताना मधेच थकले ; पुढे प्रश्नपत्रिका सोडवू शकत नाही असे वाटल्यास त्यांना महाविद्यालयातील प्रत्यक्ष अध्यापनाशी संबंध नसलेला कोणताही कर्मचारी लेखनिक म्हणून देता येईल. हा कर्मचारी या विद्यार्थ्यांने बोललेली भाषा समजू शकत असावा. या लेखनिकांची काळजीपूर्वक निवड करावी हा लेखनिक बहुविकलांग, सेरेब्रल पाल्सी, लोकोमोटर डिसेबिलिटी विद्यार्थी काय सांगतो ते समजून लिहू शकेल असा असावा.

३) आकृत्या, नकाशे, तक्ते इ. न काढण्यासाठी सवलत देय राहील. याचे गुण त्या विद्यार्थ्याला त्याचे प्रमाणात देण्यात यावेत.

४) प्रात्यक्षिक परीक्षेऐवजी या विद्यार्थ्यांना या विषयाची तोंडी परीक्षा/बहूपर्यायी उत्तरे असलेली लेखी परिक्षा (प्रात्यक्षिकांवर आधारित) देता येईल. तोंडी परीक्षेत प्रात्यक्षिकांवर आधारित प्रश्न विचारले जावेत.

५) या मुलांना अतिरिक्त सूचना किंवा संकेताची गरज भासते, तेव्हा परिक्षेच्या वेळी त्यांची बैठकीची वेगळी व्यवस्था करण्यात यावी.

६) अशा विद्यार्थ्यांच्या परिक्षासाठी तांत्रिक पध्दतीचा वापर करण्यात यावा.(उदा.संगणक व संगणक प्रणाली Voice Synthesizer)

७) प्रश्नाची प्रक्रिया जाणून घेण्यासाठी संप्रेषण बोर्ड (Communication Board) चा वापर करावा.

८) अनुकुलनशील साहित्य आणि उपकरणांचा वापर करु देण्यात यावा. उदा.पेन्सिल व ग्रीप्स.

९) हे विद्यार्थी जास्त दाब देऊन लिहितात त्यासाठी आवश्यकतेनुसार कागद/उत्तरपत्रिका जाड पानांची देण्यात यावी.

**(६) शारिरीक वाढ खुंटणे** (Dwarfism) :-

१) ज्या महाविद्यालयात हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत तेच महाविद्यालय या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी परीक्षा केंद्र म्हणून देण्यात येईल. शिकत असलेल्या महाविद्यालयातच शरीराची योग्य स्थिती आणि बसण्याच्या व्यवस्थेसाठी अनुकुल तयार केलेले टेबल, टायपिंग मशीन, खुर्च्या यांची या विद्यार्थ्यांसाठी व्यवस्था करावी. तथापि, यासाठी संबंधित महाविद्यालयाने विद्यापीठाची मान्यता/पूर्व परवानगी घ्यावी.

२) लेखनिक घेण्याची परवानगी देण्यात यावी.

३) आवश्यकता असेल तर वाचनिक/सूचक घेण्याची परवानगी असावी.

**(७) बौध्दिक अक्षम (मतिमंद/गतिमंद)** (Intellectual Disability-Mentally challenged/ Slow Learners) :-

१) विद्यार्थ्यांना आकृत्या, नकाशे, तक्ते इ. न काढण्याची सवलत देण्यात यावी. त्यासाठीचे गुण त्या विद्यार्थ्याला त्याच प्रमाणात देण्यात यावेत.

२) विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिका टाईप करुन वा लिहून देण्याची परवानगी प्रदान करण्यात यावी. त्यांना पूर्ण प्रश्नपत्रिका वा प्रश्नपत्रिकेचा काही भाग लिहिण्यासाठी लेखनिक घेण्यास परवानगी देण्यात येईल. हे विद्यार्थी स्वत: प्रश्नपत्रिका सोडवत असताना मध्येच थकले, पुढे प्रश्नपत्रिका सोडवू शकत नाही असे वाटल्यास त्यांना महाविद्यालयातील प्रत्यक्ष अध्यापनाशी संबंध नसलेला कोणताही कर्मचारी लेखनिक म्हणून घेता येईल. हा कर्मचारी या विद्यार्थ्यांने बोललेली भाषा समजू शकत असावा. या लेखनिकांची काळजीपूर्वक निवड करावी. हा लेखनिक अध्ययन अक्षम विद्यार्थी काय सांगतो ते समजून लिहू शकेल असा असावा.

३) प्रात्यक्षिक परीक्षेऐवजी त्या विद्यार्थ्यांना त्या विषयाची तोंडी परीक्षा/बहूपर्यायी उत्तरे असलेली लेखी परिक्षा (प्रात्यक्षिकांवर आधारित) देता येईल. तोंडी परीक्षेत प्रात्यक्षिकांवर आधारित प्रश्न विचारले जावेत.

४) या गटात मोडणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांची कारक कौशल्ये अविकसित असतात याचा विचार करुन त्यांना वेगळया प्रकारची पेन्सील, पेन, ग्रीपर, गणकयंत्र वापरण्याची परवानगी द्यावी.

५) आवश्यकतेनुसार प्रौढ लेखनिक देण्यात यावा.

**(८) मानसिक आजार** (Mental Illness):-

१) ज्या महाविद्यालयात हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत ते महाविद्यालय अथवा घराजवळचे महाविद्यालय या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी परीक्षा केंद्र म्हणून देण्यात यावे.

२) या विद्यार्थ्यांची परीक्षा वेगळया वर्गात घेण्यात यावी.

३) विद्यार्थी अचानक आक्रमक/हिंसक बनला तर परिस्थिती हाताळू शकेल असाच पर्यवेक्षक नेमावा.

४) लेखी परीक्षेऐवजी ऑडिओ/व्हीडीओ रेकॉर्डर वापरुन मौखिक परीक्षा घेण्याची परवानगी देण्यात यावी.

**(९) स्वमग्न** (Autism Spectrum Disorder) **विद्यार्थ्यांसाठी सवलती** :-

१) ज्या महाविद्यालयात हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत ते महाविद्यालय या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी परीक्षा केंद्र म्हणून देण्यात यावे. त्यांच्या महाविद्यालयातच या मुलांसाठी विशेष तयार केलेले टेबल, टायपिंगमशीन, संगणक, गणकयंत्र, खुर्च्या यांची व्यवस्था करण्यात यावी.

२) विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिका टाईप करुन वा लिहून देण्याची परवानगी देण्यात येईल. त्यांना पूर्ण उत्तरपत्रिका किंवा उत्तरपत्रिकेचा काही भाग लिहिण्यासाठी लेखनिक घेण्यास परवानगी देण्यात यावी. जर हे विद्यार्थी स्वत: प्रश्नपत्रिका सोडवत असताना मधेच थकले, पुढे प्रश्नपत्रिका सोडवू शकत नाहीत असे वाटल्यास,त्यांना महाविद्यालयातील प्रत्यक्ष अध्यापनाशी संबंध नसलेला कोणताही कर्मचारी लेखनिक म्हणून घेता येईल. हा कर्मचारी या विद्यार्थ्याने बोललेली भाषा समजू शकत असावा. या लेखनिकांची काळजीपूर्वक निवड करावी. हा लेखनिक ऑटिस्टिक विद्यार्थी काय सांगतो ते लिहू शकेल असा असावा.

३) विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी त्याला खात्री वाटेल अशी व्यक्ती परीक्षा वर्गाजवळ उपस्थित रहाण्याची परवानगी देण्यात यावी.

४) विद्यार्थ्यांना आकृत्या, नकाशे/तक्ते इ. न काढण्याची सवलत देण्यात येईल. त्याचे गुण त्या विद्यार्थ्याला त्या प्रमाणात देण्यात येतील.

५) प्रात्यक्षिक आणि प्रकल्प परीक्षेस विद्यार्थ्यांना या विषयाची तोंडी परीक्षा/बहूपर्यायी उत्तरे असलेली लेखी परिक्षा (प्रात्यक्षिकांवर आधारित) देता येईल. तोंडी परीक्षेत प्रात्यक्षिकांवर आधारित प्रश्न विचारले जावेत.

६) मौखिक मुल्यमापनासाठी लेखीचा पर्याय असावा.

७) आवश्यकतेनुसार प्रौढ लेखनिक देण्यात यावा.

८) आवश्यकतेनुसार वाचनिक/Prompter (सूचक) देण्यात यावा.

९) प्रश्नाचे उत्तर अपेक्षित शब्दमर्यादेपेक्षा कमी शब्द मर्यादेत लिहिता येईल. दिर्घोत्तरी प्रश्नाची उत्तरे मुद्यांमध्ये (Key Points) लिहिता येतील. दिर्घोत्तरी प्रश्नांमध्ये मुख्य मुद्यांच्या अनुषंगाने उत्तर दिल्यास परिक्षकांनी परिक्षेतील उत्तरामध्ये थोडक्यात विषयाच्य अनुषंगाने माहिती/उत्तरे दिली आहेत का ते तपासून गुणदान करावे.

१०) या विद्यार्थ्यांची परीक्षा वेगळया वर्गात घेण्यात यावी.

११) अचानक उपचार करावे लागतील अशी स्थिती उत्पन्न झाल्यास किंवा परीक्षेच्या कालावधीतच उपचारासाठी हॉस्पीटलमध्ये दाखल व्हावे लागल्यास अशा विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करुन त्यांना पुन:परीक्षेची (Re-Exam) परवानगी देण्यात यावी. विषय शिक्षक, महाविद्यालयाचे प्राचार्य व परीक्षा विभागाचे प्रमुख यांनी यासाठी समन्वय साधावा.

१२) या गटात मोडणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांची कारक कौशल्य अविकसित असतात. याचा विचार करुन त्यांना वेगळया प्रकारची पेन्सील, पेन, ग्रीपर, गणकयंत्र वापरण्याची परवानगी देण्यात यावी.

११) अनिवार्य विषयाऐवजी (सायन्स, गणित इ.) विद्यार्थ्याला त्याला झेपेल असा विषय निवडून परीक्षा देण्याची परवानगी देण्यात यावी.

**(१०) स्नायुंची विकृती (Muscular Dystrophy)/ मेंदू व मज्जापेशी काठीण्य (Multiple Sclerosis) विद्यार्थ्यांसाठी सवलती :-**

१) ज्या महाविद्यालयात हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत ते किंवा जवळचे महाविद्यालय या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी परीक्षा केंद्र म्हणून देण्यात यावे.

२) अचानक उपचार करावे लागतील अशी स्थिती उत्पन्न झाल्यास किंवा परीक्षेच्या कालावधीतच उपचारासाठी हॉस्पीटलमध्ये दाखल व्हावे लागल्यास अशा विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करुन त्यांना पुन:परीक्षेची (Re-Exam) परवानगी देण्यात यावी. विषय शिक्षक, महाविद्यालयाचे प्राचार्य व परीक्षा विभागाचे प्रमुख यांनी यासाठी समन्वय साधावा.

३) या विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था वेगळया वर्गात करावी. वेळ प्रसंगी स्पेशल पर्यवेक्षकाची नेमणूक करावी. परीक्षा विभाग प्रमुख , महाविद्यालयीन अधिकारी यांच्या परवानगीने आवश्यकता असेल तर परीक्षा हॉस्पिटल अथवा विद्यार्थ्यांच्या घरी घेण्यात यावी.

४) लेखी परीक्षेऐवजी ऑडिओ/व्हीडीओ रेकॉर्डर वापरुन मौखिक परीक्षा घेण्याची परवानगी देण्यात यावी.

**(११) मज्जासंस्थेचे तीव्र आजार** (Chronic Neurological Conditions) :-

१) ज्या महाविद्यालयात हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत ते किंवा जवळचे महाविद्यालय या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी परीक्षा केंद्र म्हणून देण्यात यावे.

२) अचानक उपचार करावे लागतील अशी स्थिती उत्पन्न झाल्यास किंवा परीक्षेच्या कालावधीतच उपचारासाठी हॉस्पीटलमध्ये दाखल व्हावे लागल्यास अशा तर विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करुन त्याना पुन:परीक्षेची (Re-Exam) परवानगी देण्यात यावी. विषय शिक्षक, महाविद्यालयाचे प्राचार्य व परीक्षा विभागाचे प्रमुख यांनी यासाठी समन्वय साधावा.

३) या विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था वेगळया वर्गात करावी. वेळ प्रसंगी स्पेशल पर्यवेक्षकाची नेमणूक करावी. परीक्षा विभाग प्रमुख , महाविद्यालयीन अधिकारी यांच्या परवानगीने आवश्यकता असेल तर परीक्षा हॉस्पिटल अथवा विद्यार्थ्यांच्या घरी घेण्यात यावी.

४) लेखी परीक्षेऐवजी ऑडिओ/व्हीडीओ रेकॉर्डर वापरुन मौखिक परीक्षा घेण्याची परवानगी देण्यात यावी.

**(१२) अध्ययन अक्षम** (Specific Learning Disabilities) **विद्यार्थ्यांसाठी सवलती :-**

१) विद्यार्थ्यांना आकृत्या, नकाशे, तक्ते इ. न काढण्यासाठी सवलत देण्यात यावी. सदरचे गुण त्या विद्यार्थ्याला, त्या प्रमाणात देण्यात यावेत.

२) विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिका टाईप करुन वा लिहून देण्याची परवानगी देण्यात येईल. त्यांना पूर्ण उत्तरपत्रिका किंवा उत्तरपत्रिकेचा काही भाग लिहिण्यासाठी लेखनिक घेण्यास परवानगी देण्यात येईल. जर हे विद्यार्थी स्वत: प्रश्नपत्रिका सोडवत असताना मधेच थकले, पुढे प्रश्नपत्रिका सोडवू शकत नाही असे वाटल्यास त्यांना महाविद्यालयातील प्रत्यक्ष अध्यापनाशी संबंध नसलेला कोणताही कर्मचारी लेखनिक म्हणून घेता येईल. हा कर्मचारी या विद्यार्थ्याने बोललेली भाषा समजू शकत असावा. या लेखनिकांची काळजीपूर्वक निवड करावी. हा लेखनिक अध्ययन अक्षम विद्यार्थी काय सांगतो ते समजून लिहू शकेल असा असावा.

३) प्रात्यक्षिक आणि प्रकल्प परीक्षेस विद्यार्थ्यांना या विषयाची तोंडी परीक्षा/बहूपर्यायी उत्तरे असलेली लेखी परिक्षा (प्रात्यक्षिकांवर आधारित) देता येईल. तोंडी परीक्षेत प्रात्यक्षिकांवर आधारित प्रश्न विचारले जावेत.

४) या गटात मोडणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांची कारक कौशल्ये अविकसित असतात. याचा विचार करुन त्यांना वेगळया प्रकारची पेन्सील, पेन, ग्रीपर, गणकयंत्र वापरण्याची परवानगी देण्यात यावी.

५) लेखी परीक्षेऐवजी ऑडिओ/व्हीडीओ रेकॉर्डर वापरुन मौखिक परीक्षा घेण्याची परवानगी देण्यात यावी.

६) आवश्यकतेनुसार प्रौढ लेखनिक देण्यात यावा.

७) प्रश्नाचे उत्तर अपेक्षित शब्दमर्यादेपेक्षा कमी शब्द मर्यादेत लिहिता येईल. दिर्घोत्तरी प्रश्नाची उत्तरे मुद्यांमध्ये (Key Points) लिहिता येतील. अशा दिर्घोत्तरी प्रश्नांमध्ये मुख्य मुद्यांच्या

अनुषंगाने उत्तर लिहील्यास परिक्षकांनी उत्तरामध्ये थोडक्यात विषयाच्या अनुषंगाने माहिती/उत्तरे दिली आहेत का ते तपासून गुणदान करावे.

**(१३) मेंदू व मज्जापेशी काठीण्य (Multiple Sclerosis) विद्यार्थ्यांसाठी सवलती :-**

१) ज्या महाविद्यालयात हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत ते किंवा जवळचे महाविद्यालय या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी परीक्षा केंद्र म्हणून देण्यात यावे.
२) अचानक उपचार करावे लागतील अशी स्थिती उत्पन्न झाल्यास किंवा परीक्षेच्या कालावधीतच उपचारासाठी हॉस्पीटलमध्ये दाखल व्हावे लागल्यास त्या विद्यार्थ्याच्या भविष्याचा विचार करुन त्याना पुन:परीक्षेची (Re-Exam) परवानगी देण्यात यावी. विषय शिक्षक, महाविद्यालयाचे प्राचार्य व परीक्षा विभागाचे प्रमुख यांनी यासाठी समन्वय साधावा.
३) या विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था वेगळया वर्गात करावी. वेळ प्रसंगी स्पेशल पर्यवेक्षकाची नेमणूक करावी. परीक्षा विभाग प्रमुख , महाविद्यालयीन अधिकारी यांच्या परवानगीने आवश्यकता असेल तर परीक्षा हॉस्पिटल अथवा विद्यार्थ्यांच्या घरी घेण्यात यावी.
४) लेखी परीक्षेऐवजी ऑडिओ/व्हीडीओ रेकॉर्डर वापरुन मौखिक परीक्षा घेण्याची परवानगी देण्यात यावी.

**(१४) भाषण (वाचा) व भाषा अक्षमत्व (Speech and Language Disability) असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सवलती :-**

१) ज्यावेळेस निबंधात्मक प्रश्न असतात अशावेळी सदर प्रश्नावर गुणदान करतांना उत्तरे मोठ्या प्रमाणात लिहिलेले आहे हे न पाहता मुख्य मुद्यांवर (Key Points) वर लक्ष देण्यात यावे. महाविद्यालयाने याविषयीचा पत्रव्यवहार विद्यापीठाशी करणे अत्यावश्यक आहे.
२) विद्यार्थ्यांना आकृत्या, नकाशे/तक्ते इ. न काढण्याची सवलत देण्यात यावी. त्याचे गुण त्या विद्यार्थ्याला त्या प्रमाणात देण्यात यावेत अथवा त्यासाठी पर्यायी प्रश्न विचारण्यात यावेत.
३) अनिवार्य विषयाऐवजी (सायन्स, गणित इ.) विद्यार्थ्याला त्यास झेपेल असा विषय निवडून परीक्षा देण्याची परवानगी देण्यात यावी.
४) तोंडी परीक्षा लेखी स्वरुपात स्वरुपाची परवानगी देण्यात यावी.

**(१५) थॅलस्सेमिया (Thalassemia)/ कॅन्सर (Cancer):-**

१) महाविद्यालयात हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत ते किंवा जवळचे महाविद्यालय या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी परीक्षा केंद्र म्हणून देण्यात येईल. त्यांच्या महाविद्यालयातच या मुलांसाठी विशेष तयार केलेले टेबल, टायपिंग मशीन, खुर्च्याची व्यवस्था करण्यात यावी. तथापि, यासाठी संबंधित महाविद्यालयाने विद्यापीठाची मान्यता/पूर्व परवानगी घ्यावी.
२) अचानक उपचार करावे लागतील अशी स्थिती उत्पन्न झाल्यास किंवा परीक्षेच्या कालावधीतच उपचारासाठी हॉस्पीटलमध्ये दाखल व्हावे लागले तर विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करुन त्यांना पुन:परीक्षेची (Re-Exam) परवानगी देण्यात यावी. विषय शिक्षक, महाविद्यालयाचे प्राचार्य व परीक्षा विभागाचे प्रमुख यांनी यासाठी समन्वय साधावा.
३) इन्फेक्शनची शक्यता लक्षात घेऊन या विद्यार्थ्यांसाठी बैठक व्यवस्था वेगळया वर्गात करावी. वेळ प्रसंगी स्पेशल पर्यवेक्षकाची नेमणूक करावी व परीक्षा विद्यार्थ्याच्या घरी घेण्यात यावी.
४) विद्यार्थ्यांना लिहावयाचे सोयीचे व्हावे यासाठी वेगळया प्रकारची पेन्सील , पेन, ग्रीपर, संगणक देण्याची व्यवस्था उपलब्ध करावी.

५) गरज असल्यास त्यांना लेखनिक घेण्याची परवानगी देण्यात यावी.
६) विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी त्याला खात्री वाटेल अशी व्यक्ती परीक्षा वर्गाजवळ उपस्थित रहाण्याची परवानगी देण्यात यावी.
७) यापेक्षा वेगळया सोयी हव्या असतील तर पालक विषय शिक्षक, प्राचार्य व परीक्षा विभाग प्रमुख यांच्या समन्वयाने ठरविण्यात यावे.

**(१६) हिमोफिलिया** (Hemophilia):-

१) ज्या महाविद्यालयात हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत ते किंवा जवळचे महाविद्यालय या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी परीक्षा केंद्र म्हणून देण्यात येईल. त्यांच्या महाविद्यालयातच या मुलांसाठी विशेष तयार केलेले टेबल, टायपिंग मशीन, खुर्च्याची व्यवस्था करण्यात यावी. तथापि, यासाठी संबंधित महाविद्यालयाने विद्यापीठाची मान्यता/पूर्व परवानगी घ्यावी.
२) अचानक उपचार करावे लागतील अशी स्थिती उत्पन्न झाल्यास किंवा परीक्षेच्या कालावधीतच उपचारासाठी हॉस्पीटलमध्ये दाखल व्हावे लागल्यास विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करुन त्यांना पुन:परीक्षेची (Re-Exam) परवानगी देण्यात यावी. विषय शिक्षक, महाविद्यालयाचे प्राचार्य व परीक्षा विभागाचे प्रमुख यांनी यासाठी समन्वय साधावा.
३) इन्फेक्शनची शक्यता लक्षात घेऊन या विद्यार्थ्यांसाठी बैठक व्यवस्था वेगळया वर्गात करावी. वेळ प्रसंगी स्पेशल पर्यवेक्षकाची नेमणूक करावी व परीक्षा विद्यार्थ्याच्या घरी घेण्यात यावी.
४) विद्यार्थ्यांना लिहावयाचे सोयीचे व्हावे यासाठी वेगळया प्रकारची पेन्सील , पेन, ग्रीपर, संगणक देण्याची व्यवस्था उपलब्ध करावी.
५) गरज असल्यास त्यांना लेखनिक घेण्याची परवानगी देण्यात यावी.
६) विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी त्याला खात्री वाटेल अशी व्यक्ती परीक्षा वर्गाजवळ उपस्थित रहाण्याची परवानगी देण्यात यावी.
७) यापेक्षा वेगळया सोयी हव्या असतील तर पालक विषय शिक्षक, प्राचार्य व परीक्षा विभाग प्रमुख यांच्या समन्वयाने ठरविण्यात यावे.

**(१७) सिकल सेल** (Sickle Cell Disease):-

१) ज्या महाविद्यालयात हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत ते किंवा जवळचे महाविद्यालय या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी परीक्षा केंद्र म्हणून देण्यात येईल. त्यांच्या महाविद्यालयातच या मुलांसाठी विशेष तयार केलेले टेबल, टायपिंग मशीन, खुर्च्याची व्यवस्था करण्यात यावी. तथापि, यासाठी संबंधित महाविद्यालयाने विद्यापीठाची मान्यता/पूर्व परवानगी घ्यावी.
२) अचानक उपचार करावे लागतील अशी स्थिती उत्पन्न झाल्यास किंवा परीक्षेच्या कालावधीतच उपचारासाठी हॉस्पीटलमध्ये दाखल व्हावे लागल्यास विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करुन त्यांना पुन:परीक्षेची (Re-Exam) परवानगी देण्यात यावी. विषय शिक्षक, महाविद्यालयाचे प्राचार्य व परीक्षा विभागाचे प्रमुख यांनी यासाठी समन्वय साधावा.
३) इन्फेक्शनची शक्यता लक्षात घेऊन या विद्यार्थ्यांसाठी बैठक व्यवस्था वेगळया वर्गात करावी. वेळ प्रसंगी स्पेशल पर्यवेक्षकाची नेमणूक करावी व परीक्षा विद्यार्थ्याच्या घरी घेण्यात यावी.
४) विद्यार्थ्यांना लिहावयाचे सोयीचे व्हावे यासाठी वेगळया प्रकारची पेन्सील , पेन, ग्रीपर, संगणक देण्याची व्यवस्था उपलब्ध करावी.
५) गरज असल्यास त्यांना लेखनिक घेण्याची परवानगी देण्यात यावी.

६) विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी त्याला खात्री वाटेल अशी व्यक्ती परीक्षा वर्गाजवळ उपस्थित रहाण्याची परवानगी देण्यात यावी.

७) यापेक्षा वेगळया सोयी हव्या असतील तर पालक विषय शिक्षक, प्राचार्य व परीक्षा विभाग प्रमुख यांच्या समन्वयाने ठरविण्यात यावे.

**(१८) ॲसिड ॲटॅक व्हिक्टीम (Acid Attack Victim) विद्यार्थ्यांसाठी सवलती :-**

१) ज्या महाविद्यालयात हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत ते किंवा जवळचे महाविद्यालय या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी परीक्षा केंद्र म्हणून देण्यात यावे.

२) शिकत असलेल्या महाविद्यालयातच शरीराची योग्य स्थिती आणि बसण्यासाठी अनुकुल असे तयार केलेले टेबल, टायपिंग मशीन, खुर्च्या यांची या विद्यार्थ्यांसाठी व्यवस्था करण्यात यावी. तथापि, यासाठी संबंधित महाविद्यालयाने विद्यापीठाची मान्यता/पूर्व परवानगी घ्यावी.

३) अचानक उपचार करावे लागतील अशी स्थिती उत्पन्न झाल्यास किंवा परीक्षेच्या कालावधीतच उपचारासाठी हॉस्पीटलमध्ये दाखल व्हावे लागल्यास विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करुन त्यांना पुन:परीक्षेची (Re-Exam) परवानगी देण्यात यावी. विषय शिक्षक, महाविद्यालयाचे प्राचार्य व परीक्षा विभागाचे प्रमुख यांनी यासाठी समन्वय साधावा.

४) विद्यार्थ्यांना लिहावयाचे सोयीचे व्हावे यासाठी वेगळया प्रकारची पेन्सील , पेन, ग्रीपर, संगणक देण्याची व्यवस्था उपलब्ध करुन द्यावी.

५) गरज असल्यास त्यांना लेखनिक घेण्याची परवानगी द्यावी.

**(१९) पार्किंसन्स (Parkinson°s Disease):-**

१) ज्यावेळेस निबंधात्मक प्रश्न असतात अशावेळी सदर प्रश्नावर गुणदान करतांना उत्तरे मोठ्या प्रमाणात लिहिलेले आहे हे न पाहता मुख्य मुद्यांवर(Key Points) वर लक्ष देण्यात यावे. महाविद्यालयाने याविषयीचा पत्रव्यवहार विद्यापीठाशी करणे अत्यावश्यक आहे.

२) विद्यार्थ्यांना आकृत्या, नकाशे/तक्ते इ. न काढण्याची सवलत देण्यात यावी. त्याचे गुण त्या विद्यार्थ्याला त्या प्रमाणात देण्यात यावेत अथवा त्यासाठी पर्यायी प्रश्न विचारण्यात यावेत.

३) तोंडी परीक्षा लेखी स्वरुपाची परवानगी देण्यात यावी.

उपरोक्त नमुद वर्गवारीतील दिव्यांग विद्यार्थी ज्या महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत आहे त्या महाविद्यालयातील प्राचार्यांनी या शासन निर्णयामध्ये नमुद केलेल्या सर्व सवलती व सुविधा या विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळतील याची दक्षता घ्यावी. सदर शासन निर्णय राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागातंर्गत येणाऱ्या सर्व विद्यापीठे व त्यांच्या संलग्नीत असणारी सर्व महाविद्यालये तसेच राज्यशासना मार्फत विशेष कायद्यान्वये स्थापन करण्यात आलेल्या सर्व स्वंय अर्थसहाय्यीत विद्यापीठांना लागू राहील. सदर आदेशाची प्रभावी अमंलबजावणी होईल हे पाहण्याची जबाबदारी सर्व उपरोक्त नमुद विद्यापीठांची राहील.

सदरहू शासन निर्णयाची तात्काळ प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०३०४१३१६२५२३०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Siddharth Kharat

Digitally signed by Siddharth Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6f8cb55012423727bece629d954713c1ec2962a9ca9b909643170e56321cfd24, cn=Siddharth Kharat
Date: 2017.03.04 17:49:42 +05'30'

**( सिध्दार्थ खरात )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय ,मुंबई.
४. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय ,मुंबई.
५. मा. अप्पर मुख्य सचिव,उच्च व तंत्रशिक्षण यांचे स्वीय सहाय्यक ,मंत्रालय ,मुंबई.
६. सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरु /कुलसचिव.
७. राज्यातील सर्व स्वंय अर्थसहाय्यीत विद्यापीठांचे कुलगुरु / कुलसचिव.
८. सर्व संचालक, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
९. उप सचिव, (विशि) (मशि) (तांशि) उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१०. निवड नस्ती- विशि-३.